# Vinayak

Engineering Systems Pvt. Ltd. Pune

# Bag For School 2026




Implementation by

**Rasikashraya**

Parwa road Ghatanji Dist Yavatmal - 445301
www.rasikashraya.org











**शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे.** मात्र गरिबी, आर्थिक विवंचना, सामाजिक दुर्लक्ष आणि दुर्गम आदिवासी भागातील प्रतिकूल परिस्थितीमुळे आजही अनेक विद्यार्थी आवश्यक शैक्षणिक साहित्यापासून वंचित आहेत. शाळेत जाण्याची इच्छा असूनही साधनांच्या अभावामुळे त्यांच्या शिक्षणाच्या वाटेवर अडथळे निर्माण होतात. या अडथळ्यांवर मात करून प्रत्येक बालकाच्या हातात शिक्षणाचे बळ आणि स्वप्नांना उभारी देणे, हीच काळाची गरज आहे.

याच जाणिवेतून **रसिकाश्रय संस्थेने** मागील पाच वर्षांपासून आदिवासी गावांतील पोड, पाडे आणि दुर्गम वस्त्यांवरील विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य व दप्तर वितरणाचा उपक्रम सातत्याने राबविला आहे. या उपक्रमातून आजवर **३२८ शाळांमधील ५७२५ विद्यार्थ्यांपर्यंत** पोहोचून त्यांच्या शैक्षणिक गरजांना आधार देण्यात आला आहे.

चालू शैक्षणिक वर्षात **घाटंजी, यवतमाळ, कळंब, राळेगाव , मारेगाव आणि बाभूळगाव** या सहा तालुक्यांतील ९८ **शाळांमधील २२१४ विद्यार्थ्यांपर्यंत** शालेय साहित्य पोहोचविण्यात आले आहे. या उपक्रमाला **विनायक इंजिनीअरिंग सिस्टिम प्रा. लि., पुणे** यांचे मिळालेले सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी यावर्षी ४०३ **दप्तरांच्या निर्मितीसाठी आर्थिक योगदान** देत अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ दिले आहे. त्यांच्या या संवेदनशील आणि सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल रसिकाश्रय संस्था मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करते.

**हा उपक्रम केवळ दप्तर किंवा शालेय साहित्य देण्यापुरता मर्यादित नाही; तो एका बालकाच्या हातात शिक्षणाची संधी, डोळ्यांत भविष्याचे स्वप्न आणि मनात आत्मविश्वास देण्याचा प्रयत्न आहे.** एका छोट्याशा दप्तरात केवळ पुस्तके नसतात, तर त्यात असतात असंख्य स्वप्ने, उज्ज्वल भविष्याची आशा आणि आयुष्य बदलण्याची संधी.

या शैक्षणिक वर्षात विनायक इंजिनिअरिंग सिस्टिम प्रा. लि., पुणे यांचे कडून घाटंजी, राळेगाव व मारेगाव या तीन तालुक्यातील ३५ शाळा मधील ४०३ विध्यार्थी यांना बॅग व शालेय  साहित्यसह  देण्यात आले, तरी त्याचे शाळा निहाय्य विविरण खालील प्रमाणे....

| अनु. क्रमांक | गाव | तालुका | बॅग आणि शालेय साहित्य वितरीत झालेल्या मुलांची संख्या | अनु. क्रमांक | गाव | तालुका | बॅग आणि शालेय साहित्य वितरीत झालेल्या मुलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वागदा | घाटंजी | 03 | १९. | हिवरी | यवतमाळ | 33 |
| २. | वाघू पोड | घाटंजी | 02 | २०. | वाटखेड | यवतमाळ | 10 |
| ३. | केळापूर | घाटंजी | 12 | २१. | सालोड | यवतमाळ | 25 |
| ४. | शारी | घाटंजी | 07 | २२. | लोणी | यवतमाळ | 10 |
| ५. | कापसी | घाटंजी | 08 | २३. | झाडकिन्ही | कळंब | 15 |
| ६. | उंदरणी | घाटंजी | 10 | २४. | किनवट | कळंब | 11 |
| ७. | दहेगाव | घाटंजी | 07 | २५. | मजरा | कळंब | 09 |
| ८. | कोळझरी | घाटंजी | 06 | २६. | उमरी | कळंब | 12 |
| ९. | आंबेझरी | घाटंजी | 09 | २७. | धोत्रा | कळंब | 26 |
| १०. | कोच्छी | घाटंजी | 05 | २८. | गणोरी | बाभूळगाव | 15 |
| ११. | घाटुंबा | घाटंजी | 07 | २९. | उमरी | बाभूळगाव | 08 |
| १२. | शिवणी पोड | घाटंजी | 08 | ३०. | गीमोना | बाभूळगाव | 07 |
| १३. | जरंग | घाटंजी | 17 | ३१. | नांदुरा | बाभूळगाव | 09 |
| १४. | मोवडा लहान | घाटंजी | 07 | ३२. | सावंगी | बाभूळगाव | 16 |
| १५. | कोठा | घाटंजी | 04 | ३३. | हस्तापुर | बाभूळगाव | 03 |
| १६. | राजूरवाडी | घाटंजी | 20 | ३४. | कोंढा | बाभूळगाव | 20 |
| १७. | टिटवी | घाटंजी | 19 | ३५. | नायगाव | बाभूळगाव | 22 |
| १८. | मोवडा | घाटंजी | 01 | | | एकूण | 403 |



## वर्ग निहाय विध्यार्थी संख्या...




**Block Wise Distribution**

Ghatanji Block - 151
Yavatmal Block - 79
Kalamb Block - 73
Babhulgaon - 100



## या शैक्षणिक वर्षात आम्ही 2214 मुलांपर्यंत पोहचलो...










**Vinayak**

Engineering Systems PVT. LTD.
Vrudavan Commercial Complex
Sr.No. 52/27/2/1 office no. 9, D.P. Road
Kothrud Pune – 411038,